**कि.दि.अ.नं. ५७/२०२१**
श्रीकांत पाटील वि. सुभाष कणसे

**निशाणी ३८, ४० व ४२ वरील आदेश** :

१. अर्ज व अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. प्रस्तुतचे किरकोळ दिवाणी अपील हे रे.दि.मु.नं. ३३/२०२१ मधील निशाणी ६ वरील आदेशाविरुध्द दाखल केलेले आहे. प्रस्तूत प्रकरणातील अपेलंट नं. ३ कै. श्री. तानाजी शंकर पाटील हे दिनांक १६/०१/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद केले प्रमाणे वारस आहेत. अपेलंट यांना विहीत मुदतीत कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने तसेच अपेलंट नं. ३ यांची पत्नी तसेच अपेलंट नं. १ यांची आई आजारी असल्याने मुदतीत वारस अभिलेखावर घेता आले नाहीत. त्यामुळे अपीलकार नं. ३ विरुध्द झालेला अबेटचा आदेश रद्द होऊन त्यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ होऊन त्यांचे अर्जात नमुद केले प्रमाणे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुतचे अर्ज केले आहेत. जाबदार नं. १ व २ यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता, अपीलाचे काम सुरु असताना यातील अपेलंट नं. ३ कै. श्री. तानाजी शंकर पाटील हे दिनांक १६/०१/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी अपीलकार यांना विलंब झालेला आहे. त्यांना अर्जात नमुद केले प्रमाणे वारस आहेत. प्रकरणाचे स्वरुप पहाता त्यामध्ये अपीलकार व जाबदार यांचे हक्क व हितसंबंध असल्याचे दिसुन येते. मयत अपीलकार यांचे वारस या कामी आवश्यक

पक्षकार आहेत. त्यांच्याशिवाय वाद विषयाचे समुळ निराकरण होणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज निशाणी ३८, ४० व ४२ रक्कम रु. २५०/– खर्चावर मंजूर करण्यात येत आहेत.

२. अर्जदार यांनी खर्चाची रक्कम १४ दिवसाच्या आंत न्यायालयात जमा करण्यात यावी.

३. रक्कम जमा केल्यानंतर ती शासन जमा करण्यात यावी व अपेलंट नं. ३ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो व त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

४. अर्जात नमुद केलेप्रमाणे अपीलकार यांनी या आदेशाच्या दिनांकापासुन १४ दिवसाच्या आंत अपीलमेमोत दुरुस्ती करुन दुरुस्त अपीलनाम्याची प्रत अभिलेखावर दाखल करुन जाबदारांना देखील पुरवावी.

५. अर्जाचा खर्च अर्जदाराने सोसावा.

(अनिरुध्द सुभाष गांधी)

दिनांकः– १६/०१/२०२३ जिल्हा न्यायाधीश –१, इस्लामपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | : | Shri. Pradip T. Patil (Grade-I) |
| Court Name | : | Addl. Sessions Court, Islampur. |
| Date of Judgment/order | : | 16/01/2023 |
| Signed by P.O. on | : | 16/01/2023 |
| Uploaded on | : | 18/01/2023 |